aglasem.com

FOR KARNATAKA CLASS 10 PREPARATION

Karnataka SSLC Model Question Paper 2027 for Marathi First Language (Paper 1) Key Answers

EXAM	YEAR	TYPE	SUBJECT
Karnataka Class 10	2027	Answer Key	Marathi

ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಪರೀಕ್ಷೆ ಮತ್ತು ಮೌಲ್ಯಸಿರ್ಣಯ ಮಂಡಲಿ, ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು - 560 003

KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD,
MALLESHWARAM, BENGALURU - 560 003

SSLC MODEL QUESTION PAPER-1 2026-27

ಮಾದರಿ ಉತ್ತರಗಳು
MODEL ANSWERS

ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M** **Code No. : 08-M**

ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ
Subject : First Language — MARATHI

[ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 **[Max. Marks : 100**

प्रश्न क्र.	अचूक उत्तरे	गुण
I.	**पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. 6x1=6**	
01	'दुर्बळ' या शब्दाचा संधीविग्रह असा होतो – (सोपा) (अ) दु : + बळ (ब) दु + बळ (क) दे + बळ (ड) दुर + ळ **उत्तर : (अ)** दु : + बळ	1
02	'अदिती अभ्यास करत आहे.' या वाक्यातील काळ ओळखा - (अ) भुतकाळ (ब) भविष्यकाळ (क) वर्तमानकाळ (ड) अपूर्ण भविष्यकाळ **उत्तर : (क) वर्तमानकाळ**	1
03	'पंचवटी' हे या समासाचे उदाहरण आहे - (अ) अव्ययीभाव समास (ब) बहुव्रीही समास (क) द्वंद्व समास (ड) द्विगू समास **उत्तर : (ड) द्विगू समास**	1
04	'जोपर्यंत आपल्याकडे पैसा आहे, तोपर्यंत अनेक माणसे गोळा होतात' या अर्थाची म्हण ही आहे - (अ) चोराच्या मनात चांदणे (ब) खाई त्याला खवखवे (क) असतील शिते तर जमतील भूते (ड) अति तेथे माती **उत्तर : (क) असतील शिते तर जमतील भूते**	1

05	'पंधरा दिवसातून एकदा प्रसिद्ध होणारे' या शब्दसमुहासाठी एक योग्य शब्द आहे- (अ) दैनिक (ब) पाक्षिक (क) वार्षिक (ड) मासिक **उत्तर : (ब) पाक्षिक**	1
06	'पक्षी झाडावर बसला आहे.' या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ही आहे - (अ) शब्दयोगी अव्यय (ब) उभयान्वयी अव्यय (क) केवलप्रयोगी अव्यय (ड) क्रियापद **उत्तर : (अ) शब्दयोगी अव्यय**	1
II 7.	**पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा. 4 x 1 = 4** ने, ए, शी : तृतीया विभक्ती : : ऊन, हुन : ..... **उत्तर :पंचमी विभक्ती**	1
8.	आराध्या गाणे गाते : कर्तरी प्रयोग :: पोलीसांनी चोर पकडला : ..... **उत्तर : कर्मणी प्रयोग**	1
9.	परिणय : विवाह : : नृप : ..... **उत्तर : राजा, भूपती, भूपाल इ.**	1
10.	ज्ञानी : अज्ञानी : : उत्तीर्ण : ..... **उत्तर : अनुत्तीर्ण**	1
III 11.	**खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. 7 x 1 = 7** बोक्याने आपली एकादशी कशी मोडली ? **उत्तर : बोक्याने पोपटावर हल्ला करुन आपली एकादशी मोडली.**	1
12	जपानी स्त्री कशी आहे ? **उत्तर : जपानी स्त्री गोड, शालीन, हसरी आहे.**	1
13	'नोकर? छे, मालक !' या पाठाचे मूल्य कोणते? **उत्तर : 'नोकर? छे, मालक!' या पाठाचे मूल्य** स्वभावदोष, विनोदनिर्मिती हे आहे.	1
14	संत ज्ञानेश्वरांच्या ओवीचा गौरव कसा केला जातो ? **उत्तर : 'ओवी ज्ञानेशाची' असा ज्ञानेश्वरांच्या ओवीचा गौरव केला जातो.**	1
15	विरहिणी म्हणजे काय ? **उत्तर : देवाच्या विरहाने आर्त झालेल्या भक्ताच्या अवस्थेचे वर्णन करणारी काव्यरचना म्हणजे विरहिणी होय.**	1
16	लोकसेवेत मग्न असणाऱ्यांना कशाची पर्वा नसते ? **उत्तर : लोकसेवेत मग्न असणाऱ्यांना आपल्या जिवाची (देह राहील का जाईल) याची पर्वा नसते.**	1

17	भर दुपारी कोणाची रांग लागते? **उत्तर : भर दुपारी डोक्यावरून पाणी वाहून नेणाऱ्या बायकांची रांग लागते.**	1
IV 18.	**खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. 3 x 2 = 6** खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. अ) विराजमान होणे **(1)** **उत्तर : विराजमान होणे – आसनावर ऐटीत बसणे.** ब) याचना करणे **(1)** **उत्तर : याचना करणे** – विनवणी करणे, प्रार्थना करणे. (वाक्यप्रचाराचा वाक्यात उपयोग व्हावा, अर्थाचा नव्हे.) **(अर्थ सांगणे $\frac{1}{2}$ गुण, वाक्यात उपयोग $\frac{1}{2}$ गुण**	2
19.	अलंकार ओळखून लक्षणे लिहा : "संभ्रमी त्या जाहले कृष्णापरी जे सारथी." **उत्तर : उपमा अलंकार** **लक्षणे- दोन वस्तूतील साम्य चमत्कृतिपूर्ण रितीने जेथे वर्णन केलेले असते तेथे उपमा अलंकार होतो. (या अलंकारात सारखा, सारखी, परी असे शब्द येतात.)**	2
20.	गण पाडून व्रत्त ओळखा. "घालील धाड शिशुपाल कळे न केव्हा" **उत्तर :** " घा ली ल | धा ड शि | शु पा ल | क ळे न | के व्हा " _ _ U | _ U U | U _ U | U _ U | _ _ त भ ज ज ग ग **वृत्ताचे नाव : वसंततीलका** **01** **लक्षणे :** **01** **अक्षरसंख्या : 14** **गण : त, भ, ज, ज, ग ग** **यती : 8 व्या अक्षरावर**	2
V 21.	**खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा. 7 x 2 = 14** **डोळस मनुष्य आंधळ्यांना काय म्हणाला?** **उत्तर :** 'तुम्ही ज्याला हत्ती समजता तो हत्तीचा एक-एक अवयव आहे. तो हत्ती नव्हे. अशा सर्व अवयवांनी युक्त (जो आहे) तो हत्ती होय.' असे डोळस मनुष्य आंधळ्यांना म्हणाला.	2
22.	**'विद्या ही महासागरासारखी आहे' असे आंबेडकर का म्हणतात ?** **उत्तर :** विद्येला आंबेडकर पहिले दैवत मानतात. महासागर जसा अथांग विशाल असतो अगदी त्याचप्रमाणे विद्या सुद्या अमर्याद आहे. गंगा, यमुना यासारख्या नद्या सागराला मिळतात. तेव्हा त्या सागराशी एकरुप होतात.	2

	त्याचप्रमाणे माणूस विद्यारुपी महासागरात आल्यावर त्याच्यात विनम्रता येते. विद्या ही माणसाला संकुचीत विचारसरणीतून बाहेर काढून महासागरासारखे विशाल आणि उदार बनवते. म्हणून विद्या महासागरासारखी आहे. असे आंबेडकर म्हणतात.	
23.	**"छत्री, छप्पर मुर्दाबाद!" संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **उत्तर : संदर्भ :** वरील संदर्भ 'मनाचे पिंजरे' या पाठातील असून या पाठाचे लेखक अनंत काणेकर हे आहेत. **स्पष्टीकरण :** परिस्थितीचे पिंजरे तोडून टाकल्याशिवाय मानवाची मुक्ती होऊ शकत नाही. त्याप्रमाणे या जागतिक क्रांतीचाही प्रारंभ मनाचे पिंजरे तोडून टाकण्यापासून व्हावा असे लेखकाला वाटते. मोठमोठी माणसे मोठमोठ्या क्रांत्या करत असतात. आपण मात्र छोट्या माणसांनी "छत्री, छप्पर मुर्दाबाद!" यापासून त्याची सुरुवात करावी.	2
24.	**रा.रं. बोराडे यांचा परिचय लिहा.** **उत्तर :** पूर्ण नाव : रावसाहेब रंगराव बोराडे (1940-2025) यांच्या कथा ग्रामीण जीवनावर आधारलेल्या आहेत. ग्रामीण जीवन, ग्रामीण व्यक्तिरेखा व त्यांच्या व्यथा यांचे सुरेख चित्रण त्यांच्या साहित्यातून आलेले आहे. ग्रामीण भाषेतील गोडवा, रांगडेपणा, सर्व लकबी, त्यांच्या लेखनातून दिसून येतात. 'माळराण', 'बोळवण', 'मळणी' हे त्यांचे प्रसिद्ध कथासंग्रह आहेत. 'पाचोळा' या कादंबरीला व 'मळणी' या कथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट साहित्यनिर्मितीचा पुरस्कार मिळालेला आहे.	2
25.	**'हं हळू बोल तनयाते' संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **उत्तर : संदर्भ :** वरील संदर्भ 'पाहुणे' या कवितेतील असून या कवितेचे कवी प्रल्हाद केशव अत्रे (केशवकुमार) हे आहेत. **स्पष्टीकरण :** घरी आलेले पाहुणे मन मानेल तसे वागतात. अशा पाहुण्यांचे वर्तन पाहून बाळयाला आश्चर्य वाटते. तो आपल्या आईला हे पाहुणे कोठून आलेले आहेत याविषयी विचारतो. तेव्हा आपले बोलणे ओट्यावर झोपलेले पाहुणे ऐकतील म्हणून ती आपल्या बाळाला हळू बोलण्याची बोट वर करून सूचना करते.	2
26.	**इंद्रजित भालेराव यांचा परिचय लिहा.** **उत्तर :** इंद्रजित भालेराव (1962) यांची कविता संत तुकाराम आणि संत कबीरांचा वारसा घेऊन आलेली आहे. 'दूर राहिला गाव', 'जातं गाणं गातं' हे त्यांचे प्रसिद्ध कवितासंग्रह आहेत. 'आम्ही काबाडाचे धनी', 'कुळंबिणीची कहानी' या त्यांच्या दीर्घ कविता प्रसिद्ध आहेत. 'रानमळयाची वाट', 'माझ्या गावाकडं चल माझ्या दोस्ता' हे त्यांचे बाल- कवितासंग्रह आहेत. ग्रामीण जीवन व निसर्गाशी असलेले नाते हे त्यांच्या कवितेची ठळक वैशिष्ट्ये आहेत. लोकवाङ्मयाचा उपजत रेखीवपणा, मायबोलीचा थेट जिव्हाळा हे त्यांच्या लेखनाचे विशेष आहेत.	2

27.	**भुके जीव काय करतील असे कवी म्हणतो?** **उत्तर :** भुके जीव विठ्ठलाकडे भाकरीच्या रुपाने पोटात येऊन भूक भागविण्याची विनंती करीत आहेत. विठ्ठलाने जर भूक भागविली नाही तर भुके जीव भूकेने व्याकूळ होऊन सैरावैरा धावतील. ते एकमेकांना खायला मागेपुढे पहाणार नाहीत. देवांना थेट इशारा देतील. वेळप्रसंगी देवाच्या माथ्यावर घणाचे घावही घालतील. देवरक्तही प्राशन करतील. कारण ते अन्नाचे भक्त आहेत.	2
VI 28.	**खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा. 1 x 3 = 3** **अ) देव तारी त्याला कोण मारी** **किंवा** **ब) जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण** **उत्तर : I) कल्पनेचा अर्थ** 1 **II) उदाहरण व स्पष्टीकरण** $1\frac{1}{2}$ **III) तात्पर्य** $\frac{1}{2}$	3
VII 29.	**खालील प्रश्नांची पाच-सहा वाक्यात उत्तरे लिहा. 10 x 3 = 30** **वसईचा किल्ला घेण्यासाठी चिमाजीअप्पांनी कोणकोणते प्रयत्न केले?** **उत्तर :** चिमाजीअप्पांनी कोकणातील बराच मुलूख जिंकून पुढील प्रदेशावर आपले वर्चस्व स्थापन करण्यासाठी वसईपर्यंत गेले. वसई किल्ल्यावर पोर्तुगीजांचे वर्चस्व होते. हा किल्ला समुद्रात होता. केवळ एकाच बाजूने जमीन होती. तेव्हा किल्ला घेण्यासाठी प्रथम आरमारांच्या सहाय्याने लढाई केली गेली. तीन वर्ष लढूनदेखील यश मिळाले नाही. पण किल्ला घेण्याचा निर्धार पक्का होता. किल्ल्यातील भेद जाणण्यासाठी सरदारांनी वेगळा वेष परिधान करून गुप्त माहिती मिळविली. शेवटी तहाद्वारे चिमाजीअप्पांनी किल्ला ताब्यात घेतला.	3
30.	**'जपानी स्त्री' या पाठाच्या आधारे जपानी स्त्रीचे स्वभाववैशिष्टे लिहा.** **उत्तर :** 'जपानी स्त्री' या पाठात लेखिका इंदू साक्रीकर यांनी जपानी स्त्रीच्या अनेक स्वभावगुणांचे वर्णन केले आहे. जपानी स्त्री रुपाने जशी गोड आहे तशी स्वभावाने प्रेमळ व विनम्र आहे. पाहुण्यांचे स्वागत खूप मनोभावे करतात. त्या खूप मेहनती आहेत. हॉटेलातील वाढपी, बूटपॉलिश करणे, केस कापणे, कागदी डबे विकणे अशा हलक्या स्वरूपाची कामे देखील त्या न लाजता निर्भयपणे करतात. स्वत:च्या लग्नासाठी पैसा जमा करतात. घरात सर्व प्रकारच्या सुविधा असाव्यात असा त्यांचा हट्ट असतो. सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात त्या पुढारलेल्या आहेत. स्त्रियांनी स्वत: पुढाकार घेऊन अनेक संस्था स्थापन करून स्वावलंबी जीवन जगत आहेत. थोडक्यात जपानी स्त्री सोज्वळ, विनम्र व निर्भय आहे.	3

31.	**शिबिरं घेण्यासाठी येणारे शिक्षक नाखूष का असत?** **उत्तर :** डॉ.रवींद्र कोल्हे यांनी आदिवासी तरुण मुलांसाठी शिबिरे आयोजित केली; पण या शिबिरात येणारे शिक्षक हे बाहेरगावाहून आलेले असल्यामुळे आदिवासी वातावरण व परिस्थितीशी जुळवून घेताना त्यांची चिडचीड होत होती. पिढ्यानपिढ्यांपासून अक्षरज्ञान नसलेल्या आदिवासींच्या मुलांना शिकविण्याचा कळवळा त्यांच्यापाशी नव्हता. त्यामुळे 'यह आदिवासी कभी नहीं बदलेगा' असा त्यांचा समज झाला होता म्हणून ते नाखूष असत.	3
32.	**सावित्रीबाई खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी कशा होत्या ते स्पष्ट करा?** **उत्तर :** महात्मा फुले यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यात मोलाची साथ दिली. त्यासाठी त्यांनी अपार कष्ट सहन केला. आपल्या पतीच्या सांगण्यावरुन शाळेत शिक्षिका म्हणून काम करु लागल्या. त्यावेळी समाजाकडून त्यांना खुप त्रास देण्यात आला. परंतु त्या डगमगल्या नाहीत. आपल्या कार्यापासुन दुर गेल्या नाहीत. लोकांचा त्रास सहन केला व आपले कार्य चालुच ठेवले. महात्मा फुले यांच्या निधनानंतर अंतयात्रेच्या वेळी उदभवलेल्या प्रसंगाला त्या मोठया धिराने सामोरे गेल्या. स्वत: टिटवं हातात धरलं आणि एक क्रांतिकारक पाऊल उचलले पतीच्या मृतयूनंतरही खचून न जाता सत्यशोधक समाजाची कार्य समर्थपणे पुढे चालु ठेवले. यावरुनच त्या सहधर्मचारिणी होत्या हे स्पष्ट होते.	3
33.	**'आई समजून घेताना' या पाठातील दुसऱ्या प्रसंगातून लेखकाने आईला कसे समजून घेतले?** **उत्तर :** दररोज दहा वेळा "तू मरत का नाहीस?" अस आपल्या नवऱ्याला म्हणणारी अक्का खरोखरच जेव्हा पती मरण पावतो. त्यावेळी परिस्थितीने व्याकुळ झालेली आक्का जमिनीवर डोकं आपटून आक्रोश करीत होती. उठता बसता अण्णाला शिव्या देणारी आक्का आज वेगळयाच रुपात दिसत होती. ओठावर शिव्या असल्या तरी काळजात नवऱ्याविषयी अपरंपार प्रेम आणि श्रद्धा असलेली शोकमग्न आक्का नवीन वाटत होती. लेखकाला वाटलं बरं झालं आक्का नवऱ्याच्या संकटातून सुटली. पण प्रत्यक्षात तिच जगचं खलास झालं होतं. वरवर नवऱ्यावर चिडणारी आक्का मनात मात्र आपल्या नवऱ्याविषयी खुप प्रेम व श्रद्धा व्यक्त करत होती. अक्काच्या ओळावर जरी अण्णा विषयी जरी शिव्या असल्या तरी तिच्या मनात अण्णाविषयी अपार प्रेम, आदर आणि श्रद्धा होती. असे लेखकाला या प्रसंगातून दिसून आले.	3

34.	**आपणास श्रीकृष्णाला मनाने वरले आहे हे रुक्मिणी त्याला कसे सांगते?** **उत्तर :** श्रीकृष्णाचे सद्गुण ऐकल्यानंतर रुक्मिणीने मनोमन श्रीकृष्णाला आपला पती म्हणून स्वीकारते. तेव्हा शिशूपालरुपी कोल्ह्यापासून पत्नीचे रक्षण करणे हे पती म्हणून तुझे कर्तव्य आहे असे ती सांगते. कारण शिशूपालरुपी कोल्हा धाड घालून पळवून न्यावे हे तुझ्यासारख्या वीराला आवडणार नाही. तू स्वत:च्या पराक्रमाने सर्वांना पराजित करून आपणास घेऊन जावे. या शब्दात श्रीकृष्णाला मनाने वरल्याचे रुक्मिणी सांगते.	3
35.	**'जरा तरी समज धरी अंतरी' असे कवी का म्हणत आहे?** **उत्तर :** कवी राम जोशी यांनी 'भला जन्म हा' या लावणीतून (कवितेतून) भक्तीच्या ढोंगीपणावर आसूड ओढले आहेत. ढोंगी साधू स्वत:लाच देवाचा अवतार समजून लोकांना फसवितात. अशा ढोंगी साधूंना उद्देशून ते म्हणतात की, तुला दुर्लभ असा मानवजन्म मिळालेला आहे. ही त्या परमेश्वराची कृपा समज आणि परमेश्वराला शुद्ध अंत:करणाने शरण जा, त्याची सेवा कर. चराचरावर ज्याची सत्ता आहे असा तो परमेश्वर तुला या भवसागरातून तारुण नेणार आहे याची थोडी जाणीव ठेव असे कवी म्हणतो आहे.	3
36.	**पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून शुक्र, धुमकेतू, मंगळ ग्रह कशाप्रकारे याचना करीत आहेत?** **उत्तर :** 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेत पृथ्वीचे प्रेम मिळविण्यासाठी आकाशातील शुक्र, धुमकेतू, मंगळ असे अनेक ग्रह विविध प्रकारे तिच्याकडे प्रेमयाचना करीत आहेत अशी भव्य कल्पना कवीने केली आहे. **शुक्र** हा भल्या पहाटे पृथ्वीची वाट पाहत दरवाजात उभा आहे व आपल्या प्रभेचा पिसारा फुलवून पृथ्वीकडे प्रेमयाचना करीत आहे. **धुमकेतू** पिसाटाप्रमाणे (वेड्यासारखा) स्वत:चे केस पिंजारून पृथ्वीकडे प्रेमयाचना करीत आहे. **मंगळ** हा ग्रह पृथ्वीकडे प्रेमयाचना करताना लाजून लाल झालेला आहे.	3
37.	**सैनिक, देशभक्त व समाजसेवक यांचे गुणगान का केले पाहिजेत?** **उत्तर :** 'गाऊ त्यांना आरती' या कवितेत कवी यशवंत यांनी सैनिक, समाजसेवक, देशभक्त व संत यांचे गुणगाण केले आहे. **सैनिक** देशावर येणाऱ्या संकटाच्या प्रसंगी राष्ट्राच्या रक्षणासाठी धैर्याने शत्रूशी लढतात व कर्णासारखे रणांगणावर देशासाठी बलिदान देतात म्हणून त्यांचा गौरव केला पाहिजे. त्याचप्रमाणे **देशभक्त** देखील स्वत:चा स्वार्थ बाजूला ठेवून देशासाठी आपले जीवन समर्पित करतात. देश हाच देव समजून त्याची मनोभावे सेवा करतात. देशाला गुलामीतून मुक्त करणे हेच त्याचे एकमेव ध्येय असते. शेवटी मार्कंडेय ऋषीप्रमाणे अमरत्व प्राप्त करतात म्हणून त्यांचा गौरव करावा. **समाजसेवक** हे समाजाच्या उन्नतीसाठी आपल्या	3

	देहाची पर्वा न करता कार्य करतात. लोकांच्या सुखी जीवनासाठी सौभद्रासारखे आत्माहुती देतात म्हणून त्यांचा गौरव केला पाहिजे.	
38.	**'धरण' कवितेच्या आधारे स्त्रियांच्या कष्टाचे वर्णन करा.** **उत्तर :** 'धरण' या कवितेत दया पवार यांनी कष्ट करुनही उपाशी राहणाऱ्या ग्रामीण भागातील स्त्रियांच्या वेदना मांडल्या आहेत. ग्रामीण भागातील स्त्रियांना भल्या पहाटे उठून झाडलोट, दळणकांडण, स्वयंपाकपाणी यासारखी कामे करावी लागतात. घरातील कामे आटोपल्यानंतर त्यांना शेतीच्या किंवा रोजंदारीच्या कामावर जावे लागते. तहाने लेकरु असले तरी त्याला झाडाखाली किंवा वेताच्या पाठीखाली झोपवून काम करावे लागते. एवढे काबाडकष्ट करून देखील पायाला साधी चप्पल मिळत नाही म्हणून वेळप्रसंगी पायाला झाडाचा पाला बांधून काम करावे लागते. पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. एवढे कष्ट करूनही त्यांच्या जीवनात सुखाचे क्षण लाभत नाहीत पण त्या आशावादी आहेत.	3
VIII	**खालील प्रश्नांची आठ-दहा वाक्यात उत्तरे लिहा.** **4 x 4 = 16**	
39.	**पिंपळ व जांभूळ या झाडाबद्दल लेखकाने कोणत्या आठवणी सांगितल्या आहेत?** **उत्तर :** लेखक गुलजार यांना झाडे खूप प्रिय आहेत. **पिंपळ** हा पुरातन वृक्ष असून पूर्वजांनी त्याला देवाचे रूप दिले आहे. पिंपळाचे प्रत्येक अवयव औषधीच्या रुपात मानवाला उपयोग पडतात. पिंपळाबद्दल आठवणी सांगताना लेखक लिहितात, लहानपणी मित्रांसोबत पिंपळाची पाने गोळा करून 'ले मलाई बर्फ, ले मलाई बर्फ' असं ओरडत खोटा-खोटा कुल्फीवाला बनून खेळ खेळत असत. पिंपळाच्या पानांना खोटा-खोटा कात चुन्ना लावून खेळातले विडे तयार करणे, पानाचे दुकान चालवणे हाही खेळ खेळत असत. **जांभूळ** या झाडाला लेखक लहानपणीचा गारवा म्हणतात. कारण लेखक जांभळाच्या सान्निध्यात खेळत-खेळतच लहानाचे मोठे झाले. जांभळाचे झाड एखाद्या वयस्कर व्यक्तीप्रमाणे त्यांना वाटते. उन्हाळ्यात भर दुपारी जांभळाच्या झाडाखाली खेळण्यास घरातून परवानगी मिळत असे. त्या झाडाजवळ खेळताना जणू आजोबाजवळ खेळतोय असे त्यांना वाटत असे. दोन्ही हात पसरून जणू ते आशीर्वाद देत आहेत असा भास लेखकाला होत असे. **किंवा** **जंगलातील पानगळीच्या दिवसात कोणते दृश्य दिसते? त्याचे वर्णन करा.** **उत्तर :** पानगळीच्या मोसमात जंगलातील झाडांची पाने गळतात. झाडे आपला हिरवा रंग टाकून, लाल पिवळ्या, केशरी रंगाची उधळण करतात. ते पाहताना आपले भान हरपून जाते. बहावा लाल व चिनार वृक्षमंडळी आपल्या पहाडी भागात अशी काही रंगांची दाटी करतात की रंगीबेरंगी	4

	कपडे घालून कुठलीतरी वरात चालली आहे असा लेखकाला भास होतो. पानगळीच्या मोसमात जंगलातील झाडे सौंदर्याची उधळण करतात.	
40.	**गंगूबाईंनी संगीत शिक्षणासाठी कशाप्रकारे कष्ट घेतले?** **उत्तर :** गंगूबाई हनगल यांना संगीत शिक्षणाचे बाळकडू घरातूनच मिळाले. त्यांची आई अंबाबाई यांनी गंगूबाईवर संगिताचा पहिला संस्कार केला. लहानपणापासून त्यांना गायनाची आवड होती. अब्दुल करीम खाँ, द. रा. बेंद्रे गुरुजी यांनीही वेळोवेळी त्यांना संगीत शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. शालेय शिक्षणानंतर हुबळीला कृष्णाचार्य हुलगूर आणि कुंदगुळ येथे सवई गंधर्व यांच्याकडून संगीताचे धडे घेतले. त्यांचा आवाज अतिशय नाजूक, पातळ व बारीक असल्याकारणाने त्या गाऊ लागल्या की त्यांचा गळा दुखत असायचा. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांना गळ्यावर शस्त्रक्रिया करून घ्यावी लागली. त्याचा परिणाम त्यांचा आवाज पुरुषी झाला पण त्यांनी गाणे न थांबविता पुन्हा रियाज करून आपला आवाज पूर्ववत प्राप्त केला. पहाटे उठून दोन-दोन तास खर्जाचा रियाज करत असत. अशा प्रकारे त्यांनी संगीत शिक्षणासाठी वेगवेगळे कष्ट घेतले. **किंवा** **बेळगावी काँग्रेसच्या अधिवेशनातील घटनांचे वर्णन करा.** **उत्तर :** 1942 साली बेळगाव येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनाचे अध्यक्ष महात्मा गांधी होते. या कार्यक्रमाचे स्वागतगीत गाण्याचा मान गंगूबाई व त्यांच्या शाळेतील इतर विद्यार्थ्यांना मिळालेला होता. त्यावेळी त्यांचे वय अवघे 11 वर्ष होते. स्वागतगीत शिकविण्यासाठी म्हैसूरहून शिक्षक आणले होते. व्यासपीठावर महात्मा गांधी, पंडित नेहरू, गंगाधर देशपांडे, महंमद अली जीना यासारखी बडी मंडळी बसली होती. गंगूबाईंचे गाणे इतके उत्तम झाले की, प्रत्यक्ष गांधीजींनी त्यांना शाबासकी दिली. आपल्या जातीवरुन आपला अपमान होईल अशी सारखी भीती त्यांना वाटत होती पण तसे काही घडले नाही. ही घटना दीर्घकाळ त्यांच्या स्मरणात राहिली.	4
41.	**'सत्कार' कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.** **उत्तर :** 'सत्कार' या कवितेत कवी मंगेश पाडगावकरांनी पहिल्या हिरव्या तृणपात्याच्या सत्काराचे वर्णन केले आहे. सुरुवातीला धरणीने आपल्या उरावर ज्वालारसाचे चटके सहन करून कठीण असे तप केले. उगवण्याची परिस्थिती नसतानादेखील हे तृणपाते मातीशी लढा देत प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करत उगवते. धरणीच्या पोटामध्ये असलेल्या छोट्याशा बीजातून हे तृणपाते भूमीचे कठीण कवच फोडून वर येते. म्हणून त्याचा सत्कार करण्यात आला. हे तृणपाते म्हणजे विजयाचा ध्वज आहे. परमेश्वराचा साक्षात्कार आहे असे कवीला वाटते. या तृणपात्याच्या सत्कारासाठी पक्षांनी स्वागतगीत म्हटले, ढगांनी लवून मुजरा केला,	4

	वाऱ्याने लाल मातीरुपी गुलाल उधळला, दक्षिणोत्तर पावसाच्या सरी कोसळल्या, मातीतून मृदगंध उधळला, अष्ट दिशातून जयजयकार झाला अशा प्रकारे तृणपात्याचा सत्कार करण्यात आला.	
42.	**खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.** सकलास कळो .... हो आम्ही. **उत्तर :** सकलास कळो मानवता राष्ट्रभावना हो सर्वस्थळी मिळुनी समुदाय प्रार्थना उद्योगी तरुण शीलवान येथे दिसू दे, दे वरचि असा दे ||1|| जातिभाव विसरुनिया एक हो आम्ही **किंवा** सौंदर्य रमो .... वरचि असा दे. **उत्तर :** सौंदर्य रमो घराघरात स्वर्गियापरी हो नष्ट होऊ दे विपत्ती, भीती बावरी तुकडया सदा या सेवेमाजी वसू दे, दे वरचि असा दे ||1||	
IX 43.	**खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.** **1 x 4 = 4 (2+2)** भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नाही, तर ती मानवी संस्कृतीचा आणि इतिहासाचा आरसा आहे. कोणत्याही समाजाची खरी ओळख त्याच्या मातृभाषेतून होते. आजच्या जागतिकतेच्या युगात इंग्रजी किंवा इतर परदेशी भाषा शिकणे गरजेचे आहे, हे नाकारता येत नाही ; परंतु परकीय भाषेच्या मोहापायी स्वत:च्या मातृभाषेकेडे दुर्लक्ष करणे चुकीचे आहे. मातृभाषा हे आईसारखी असते, ती आपल्या विचारांना पहिली प्रगल्भता देते. जर आपली भाषाच संपली, तर त्या भाषेतील साहित्य, लोकसंस्कृती आणि पूर्वजांचे ज्ञानही नष्ट होईल. भाषा जिवंत राहते ती बोलण्याने, लिहिण्याने, वाचण्याने आजच्या तरुण पिढीने मातृभाषेचा न्यूनगंड न बाळगता तिचा अभिमानाने वापर केला पाहिजे. जोपर्यंत घरोघरी आणि दैनंदिन व्यवहारात मातृभाषेचा वापर होणार नाही, तोपर्यंत तिचे संवर्धन केवळ कागदावरच राहील. परकीय भाषांची ज्ञानखिडकी उघडी ठेवावी, पण आपल्या संस्कृतीचा पाया असलेली मातृभाषा कधीही विसरु नये.	4

	प्रश्न : **अ) परकीय भाषेच्या मोहापायी मातृभाषेकडे दुर्लक्ष करणे चुकीचे का ठरते ?** **उत्तर :** मातृभाषा आपल्या संस्कृतीचा आणि अस्मितेचा पाया असतो. मातृभाषेकडे दुर्लक्ष केल्यास आपण आपल्या मुळ संस्कृतीपासुन तुटतो आणि विचार करण्याची नैसर्गिक क्षमता गमवतो. भाषा संपली तर भाषेतील साहित्य, लोकसंस्कृती आणि पूर्वजांचे ज्ञानही नष्ट होते. म्हणून मातृभाषेकडे दुर्लक्ष करणे चुकीचे ठरते. **ब) भाषा संवर्धनासाठी आपण काय केले पाहिजे ?** **उत्तर :** आपल्या बोलण्याने, लिहीण्याने, वाचनण्याने भाषा जिवंत राहते म्हणून आजच्या तरुण पिढीने मातृभाषेचा न्यूनगंड न बाळगता तिचा दैनंदिन जिवनात व व्यवहारात अभिमानाने वापर केला पाहिजे. मातृभाषेत साहित्य आणि ज्ञाननिर्मिती केली पाहिजे. नव्यापिढीला मातृभाषेतून शिक्षण देणे गरजेचे आहे.	
X 44.	**खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा. 1 x 5 =5** **तुमच्या मित्राला / मैत्रिणीला शिक्षणाचे महत्त्व सांगणारे पत्र लिहा.** **किंवा** **शाळा सोडल्याचा दाखला मिळविण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापकांना अर्ज लिहा.** **उत्तर : पत्र :** i) प्रेषक पत्ता (पाठविणाऱ्याचा पत्ता व दिनांक) 1 ii) मायना 1 iii) विषय मांडणी व भाषा सजावट 2 iv) समारोप व स्वाक्षरी $\frac{1}{2}$ v) कोणाला पत्र पाठवावयाचे त्याचा पत्ता $\frac{1}{2}$ **किंवा** **अर्ज :** i) प्रेषक पत्ता (अर्ज लिहीणाऱ्याचा पत्ता व दिनांक) 1 ii) मायना (अधिकाऱ्याचा हुद्दा) 1 iii) विषय $\frac{1}{2}$ iv) मजकूर 2 v) सही व पत्ता $\frac{1}{2}$	5

XI 45.	**खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा.** **1 x 5 = 5** **अ) माझा आवडता समाजसुधारक** **ब) विद्यार्थी जीवनात सदाचाराचे महत्त्व** **उत्तर :** निबंध लेखनाचे मुद्दे : i) आकर्षक प्रारंभ 1 ii) विषयज्ञान 2 iii) भाषासौंदर्य 1 iv) शेवट 1	5